यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

प्रेषक, प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा

विषय - इतिवृत्त मान्यतेबाबत आणि विध्दतपरिषदे मध्ये ठेवणेबाबत.

प्रति, मा. कुलगुरू

जा.क्रं. - शिशावि/2024/
दिनांक- 27.05.2024

**संदर्भ** – य.च.म.मु.वि/सभा व दप्तर कक्ष /2024/74-16 दि.24.05.2024.

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार सभा व दप्तर कक्षाने 28.05.2024 रोजी विध्दत परिषद यांची बैठक आयोजित करण्यात आल्याचे कळविले आहे.

1) संदर्भीय पत्रनुसार स्कुल कॉन्सिल बैठक दिनांक 27.05.2024 बैठक 60 वी घेण्यात आली. या बौठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी पाठवित आहे. त्यास मान्यता द्यावी, ही विनंती.
2) स्कूल कॉन्सिल बैठक क्र. 60 च्या इतिवृत्तास मान्यता मिळाल्या नंतर मान्यता दिलेला इतिवृतास दिनांक 28.05.2024 रोजी होणा-या विद्वत परिषदेमध्ये ठेवण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

प्र. संचालक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मा. कुलगुरू 17/5

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/6996
दि. 28/5/2024



Scanned with OKEN Scanner

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. ६० दिनांक. २७.०५.२०२४

**इतिवृत**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६० दि. २७.०५.२०२४ रोजी स. ११.०० ते ०१.३० या वेळेत online व offline पद्धतीने घेण्यात आली. या बैठकीस विद्यापीठातील सदस्य प्रत्यक्ष आणि बहिस्थ सदस्य online पद्धतीने उपस्थित होते.

**प्रत्यक्ष उपस्थिती**

१. प्रा. संजिवनी महाले प्रोफेसर, अध्यक्ष व प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्शाखा
२. प्रा. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
३. प्रा. चेतना कामळस्कर , संचालक, विज्ञान विद्याशाखा
४. डॉ. लतिका गायकवाड. सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा.
५. श्रीमती. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
६. डॉ. दयाराम डी. पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
७. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
८. डॉ. राजकुमार ननवरे, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार शिक्षणशास्त्र विद्याशाखा
९. प्रा. वर्षा बहिरम, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१०. डॉ. साधना तांदळे, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
११. श्री. शिवानंद कहाळेकर, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
१२. श्री. ज्ञानेश्वर जाधव, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार. CDS.
१३. प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा (सचिव )

**दूरदृश्य प्रणाली (online)**

१. डॉ.भरतभाई जोशी, कुलगुरु, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
२. डॉ. चेतना सोनकांबळे, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. डॉ. निशा वळवी, सहयोगी प्राध्यापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

काही वैयक्तिक अडचणीमुळे खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

१. डॉ. संजय चाकणे, पुणे. ( विद्वत परिषद सदस्य ).
२. डॉ. अमृत भरवाड, वरिष्ठ प्राध्यापक, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
३. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, प्राध्यापक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.



Scanned with OKEN Scanner

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 60. | **उपस्थित सदस्यांचे स्वागत** |
| 60. 1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 01**<br>बैठक क्र. 59 च्या परिषदेचे इतिवृत्त मान्यता<br>**(सहपत्र १)**<br>**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ५९ इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| 60. 2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 02**<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे<br>**(सहपत्र २)**<br>**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ५९ कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 60. 3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179/ 2024/ 03 पीएच. डी शिक्षणक्रम**<br>**उपविषय :- 60.3.1 पीएच.डी दूरशिक्षण या विषयाकडून पीएच.डी व्यवस्थापनशास्त्र विषय बदल करणेबाबत...**<br>**टिपणी:** श्री. धनंजय रसाळ ह्यांनी पीएच.डी दूरशिक्षण कडून पीएच.डी व्यवस्थापनशास्त्र विषय बदलाबाबत विनंती अर्ज केलेला होता. दि. २० फेब्रुवारी २०२४ रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या Doctoral Research Committee मध्ये विषय क्र. DRC/Edu/2023/4 मध्ये दूरशिक्षण आणि व्यवस्थापन शास्त्र या दोन्ही विषयांची PET परीक्षेचे विषय वेगळे होते. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोग Ph.D Regulation 2016, 2018, 2022 आणि विद्यापीठ Ph.D Ordinance 2014, 2017 मध्ये याबाबत माहिती दिलेली नाही. त्यामुळे DRC मध्ये सर्वानुमते श्री. धनंजय रसाळ यांना दूरशिक्षण या विषयाकडून व्यवस्थापन शास्त्र विषय बदल करता येणार नाही असे मान्य करण्यात आले. मा. कुलगुरू विद्यापीठ संशोधन समिती अध्यक्ष या नात्याने या वृतांतास मान्यता दिलेली आहे.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>श्री. धनंजय रसाळ ह्यांच्या पीएच.डी दूरशिक्षण पीएच.डी व्यवस्थापन शास्त्र विषय बदलास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**(सहपत्र ३)**<br>**निर्णय:-** श्री. धनंजय रसाळ यांना पीएच.डी. दूरशिक्षणाकडून पीएच.डी. व्यवस्थापनाकडून बदल करता येणार नाही यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | **उपविषय 60.3.2 : शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण या विषयत पीएच.डी शिक्षणक्रम सुरु करणेबाबत....**<br>**टिप्पणी:** विद्यापीठ अनुदान आयोगाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात नियमित पीएच.डी. सुरु करण्यासाठी तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे सन २०२४ या शैक्षणिक वर्षात शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण या दोन विषयात पीएच.डी शिक्षणक्रम नियमित पद्धतीने सुरु करण्याचा मानस आहे.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:** |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण या दोन विषयात पीएच.डी शिक्षणक्रम सन २०२४ पासून नियमित पद्धतीने सुरु करण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर.....<br>**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण या दोन विषयात पीएच.डी शिक्षणक्रम सन २०२४ पासून नियमित पद्धतीने सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 60.4 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 4**<br>**विषय: एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम M – 82 (तुकडी 2022-24) संशोधन अहवाल परिशीलन कार्यवाही योजना मान्यता**<br>**टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम संशोधन कार्य अनिवार्य आहे. सर्व अभ्यासकेंद्रावर संशोधन अहवालांचे मूल्यमापन झाल्यानंतर विद्यापीठात अहवाल जमा झाल्यानंतर त्यांचे परीक्षा संशोधन विभागात परिशिलन केले जात होते. तसेच एम.ए.शिक्षणशास्त्र (M-82) 2022-24 माहितीपुस्तिकेमध्ये परिशिलन करण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले आहे. परीक्षा मंडळाच्या बैठक क्र. 36 मधील विषय क्र. 36.04.03 नुसार हे कार्य शिक्षणशास्त्र विद्याशाखेने करावे असे निर्णय घेण्यात आलेला आहे.<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 52, दिनांक 22/8/2019 विषय क्र. 52.5.3 नुसार संशोधन अहवाल परिशीलन शिक्षणशास्त्र विद्याशाखेत करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. या बैठकीच्या वृत्तांता विद्वत परीक्षा क्र. 57 मध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. संशोधन अहवाल परिशीलन निकष विकसित करण्यात आलेले आहे. मा. कुलगुरूंनी धारिका : YCMOU/NEP Cell/2023 दि. ०७/०७/२०२३ नुसार मान्यता दिलेली आहे. या बाबतची सविस्तर निकष टिप्पणी सहपत्र ४ ,मध्ये देण्यात आलेली आहे.<br>**विषय मान्यतेसाठी सादर**<br>एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या (M-82 तुकडी २०२२-२४) संशोधन अहवाल परिशीलनासाठी तयार करण्यात आलेले निकष कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ....<br>**(सहपत्र ४)**<br>**निर्णय:-** एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या (M-82 तुकडी २०२२-२४) संशोधन अहवाल परिशीलनासाठी तयार करण्यात आलेले निकषांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |

Scanned with OKEN Scanner

60.5 विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 5

**विषय: NEP 2020 नुसार एम.ए. शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रमातील अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य, आंतरवासिता, संशोधन कार्य निश्चित आणि मूल्यमापन योजना.**

**उप विषय :- 60.5.1 अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य घटक आणि मूल्यमापन.**

**टिप्पणी:** अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्यात सूक्ष्म अध्यापन कौशल्य आणि सरावपाठ ह्या दोन कृती ठेवण्यात आलेल्या आहेत. बहुतांशी बी.एड. महाविद्यालयात अध्ययनार्थी उपस्थिती कमी असते. तसेच प्रवेशाच्या वेळापत्रकातही बदल होतो. सूक्ष्म अध्यापन कौशल्य आणि सरावपाठ ह्या दोन कृती कमी करून पुढील कृतींचा समावेश करण्यात यावा असे वाटते. यातील काही कृतींना शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. ५९ मध्ये विषय क्र. ५९.४.२ व ५९.४.३ नुसार मान्यताही देण्यात आलेली आहे. त्यासाठी श्रेयांक २ आहेत, त्याला ५० गुण ठेवण्यात आलेले आहे. NEP 2020 नुसार PG Programme Education बैठक दि. २६/१०/२०२३ विषय क्र. ३ नुसार मान्यता दिलेली आहे.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

एम.ए.शिक्षणशास्त्र सन २०२४-२६ तुकडीपासून अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्य करण्यासाठी पुढील कृतींचा समावेश आणि मूल्यमापन कृती गुण विभाजन करण्यास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर....

| क्र. | कृती |
|---|---|
| १ | सहामाई / वार्षिक निकालाचे विश्लेषण आणि उपचारात्मक अध्यापन कार्यकम विकसन |
| २ | घटक अध्यापनासाठी नवीन अध्यापन पद्धतीच्या आधारे पाठ टाचण विकसन |
| ३ | मानसशास्त्र प्रयोग **किंवा**<br>किशोरावस्थेतील / कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांचा व्यष्टी अभ्यास **किंवा**<br>वार्षिक नियोजन (एक इयता एक विषय) |
| ४ | व्याख्यान **किंवा**<br>व्याख्यान (संहिता लेखन) |
| ५ | सहशालेय कार्यक्रमांचे नियोजन (२ कार्यक्रम) |

अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्याचे मूल्यमापन अंतर्गत परीक्षक २५ गुण (५०%) आणि बहिस्थ परीक्षकाद्वारे अंतिम मूल्यमापनासाठी २५ गुण (५०%) ठेवण्यात आलेले आहे. सविस्तर मूल्यमापन योजना सहपत्र ५ त्यास चर्चा व मान्येतेसाठी सादर....

**(सहपत्र ५)**

**निर्णय:-** सन २०२४ या प्रवेशित तुकडी पासून अध्यापन विषयक क्षेत्रीय कार्याच्या कृती, अंतर्गत आणि अंतिम परीक्षा मूल्यमापन निकषांना मान्यता देण्यात आली.

**उप विषय :- 60.5.2: एम.ए. शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रमासाठी आंतरवासिता कार्यवाही**

**टिप्पणी:** एम.ए. शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रमासाठी आंतरवासिता कार्याचाही समावेश करण्यात आलेला आहे. आंतरवासिता कार्यात देण्यात आलेल्या कृतीही निश्चित करण्यात आलेल्या आहे. त्यास शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद विषय क्र. ५९.४.३ मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचे



Scanned with OKEN Scanner

मूल्यमापन विभाजन पुढे दिलेले आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर....

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.**

आंतरवासिता या घटकात पुढील कृतींचा समावेश करण्यास मान्यता व चर्चेसाठी सादर .......

१. अनुभवी शिक्षकाच्या अध्यापनाचे निरीक्षण आणि विमर्षण
२. एका घटकाबाबत संविधान तक्ता विकसन त्याआधारे घटक चाचणी तयार करणे.
३. शाळा व्यवस्थापन समितीच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर झालेला परिणाम.
४. शालेय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध योजना.
५. वैकल्पिक विषयावर आधारित आंतरवासिता

| **शैक्षणिक व्यवस्थापन, प्रशासन व नेतृत्व** | **विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन** |
|---|---|
| प्रशासकीय कार्यासाठी आवश्यक कौशल्यांचा शोध | समावेशित शाळेतील दिव्यांग विद्यार्थी अभ्यास |

आंतरवासिता मूल्यमापन अंतर्गत परीक्षक २५ गुण (५०%) आणि बहिस्थ प्रीक्षाकाद्वारे अंतिम मूल्यमापनासाठी २५ गुण (५०%) ठेवण्यात आलेले आहे. सविस्तर मूल्यमापन योजना सहपत्र ६ मध्ये दिलेली आहे. अंतिम मूल्यमापन आंतरवासिता कार्यपुस्तिका मूल्यमापन १५ गुण मौखिक परीक्षा १० गुण या कृती NEP 2020 नुसार PG Programme Evaluation बैठक दि. २६/१०/२०२३ वृतांत मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर....

(सहपत्र ६)

**निर्णय:-** सन २०२४ या प्रवेशित तुकडी पासून अध्यापन विषयक आंतरवासिता कार्य कृती, अंतर्गत मूल्यमापन आणि अंतिम परीक्षा मूल्यमापन निकषाना मान्यता देण्यात आली.

**उप विषय :- 60.5.3: एम.ए. शिक्षणशास्त्र M -83 संशोधन अहवाल मूल्यमापन**

**टिप्पणी:** NEP २०२० नुसार एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमात संशोधन कार्य सत्र ३ मध्ये '४'श्रेयांक आणि सत्र ४ मध्ये '६' श्रेयांकाचे आहे. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या प्रपत्रात विद्यार्थ्यांने सादरीकरण करणे आवश्यक आहे. सत्र ३ आणि सत्र ४ मधील संशोधन कार्यातील विविध घटक आणि मूल्यमापन योजना सहपत्र ७ मध्ये देण्यात आलेली आहे. सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.....

(सहपत्र ७)

**निर्णय:-** सन २०२३-२४ या प्रवेशित तुकडी पासून संशोधन अहवाल सत्र ३ आणि सत्र ४ कृती, अंतर्गत आणि अंतिम परीक्षा मूल्यमापन निकषांना मान्यता देण्यात आली.

60.6 **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 6**

**विषय: एम.ए.शिक्षणशास्त्र संशोधन अहवाल निर्लेखीकरण करणेबाबत**

**टिप्पणी:** एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमात संशोधन अहवाल अनिवार्य आहे. विद्यार्थी आपले संशोधन कार्य संशोधन मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करून अभ्यासकेंद्रावर जमाकरतात त्यांचे अंतर्गत



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | आणि बहिस्थ परीक्षकांद्वारे मूल्यमापन केले जाते. मूल्यमापनात केंद्रनिहाय तफावत येते. त्यामुळे विद्यापीठात सर्व संशोधन अहवालाच्या एक – एक प्रत मागवण्यात येतात. त्यासाठी दरवर्षी २५००-३००० संशोधन अहवाल शिक्षणशास्त्र विद्याशाखेत जमा होतात. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्रतिनिधी आणि अभ्यासकेंद्र प्रतिनिधीद्वारे संशोधन अहवालांचे परिशीलन केले जाते. विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर झाल्यानंतर १ वर्षाने संशोधन अहवाल पेपर pulping करण्यासाठी मा. कुलगुरूंकडे प्रस्ताव पाठवण्यात आलेला होता. त्यांनी या सदर विषयाला 'प्रशाला बैठकीत मान्यता द्यावी' असा अभिप्राय दिलेला आहे. मान्यता व चर्चेसाठी सादर.<br>**विषय मान्यतेसाठी सादर**<br>१) एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या सन २०२१-२०२३ या तुकडीच्या विद्यार्थ्यांचे संशोधन अहवाल निर्लेखन करण्यात मान्यतेसाठी सादर.<br>२) एम.ए.शिक्षणशास्त्रातील संशोधन अहवाल निकाल जाहीर झाल्यानंतर १ वर्षांनी निर्लेखन करण्यास मान्यता व चर्चेसाठी सादर.<br>**(सहपत्र ८)**<br>**निर्णय:-** एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या सन २०२१-२०२३ या तुकडीच्या विद्यार्थ्यांचे संशोधन अहवाल निर्लेखन करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या शिक्षणक्रमाचा प्रवेश कालावधी असेपर्यंत आणि शेवटची परीक्षा आणि त्याचा निकाल लागेपर्यंत ठेवण्यात यावे. या संशोधन अहवालांच्या softcopy तयार करून त्यानंतरच विद्यापीठाच्या कागदपत्र निर्लेखन नियमनुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 60.7 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 7**<br>**विषय: बी.एड शिक्षणक्रमासाठी पदवी आणि पदव्युत्तर पदवीसाठी श्रेणी अंक आणि विस्तार Range मान्यता देणेबाबत....**<br>**टिप्पणी:** बी.एड शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी प्रवेशार्थींना पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदवीनंतरची अतिरिक्त पदविकेतील विविध श्रेणीतील गुण दिले जातात. मुक्त विद्यापीठात प्रवेश घेणारे प्रवेशार्थिनी विविध विद्यापीठात विविध वर्षात पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदवीनंतरची अतिरिक्त पदविका प्राप्त केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार वेळोवेळी पंचबिंदू, सप्तबिंदू आणि दशबिंदू श्रेणींचा वापर केलेला आहे. गुणदानात एकवाक्यता राहण्याच्या दृष्टीने बी.एड.शिक्षणक्रम २०२४ च्या प्रवेश प्रक्रीयेसाठी विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर उत्तीर्णतेची श्रेणी असल्यास त्यांनी तशी नोंद करावी. त्यानुसार पुढीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात येतील. मात्र, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर श्रेणी नसल्यास आणि विद्यार्थ्याला गुण हवे असल्यास त्याने संबंधित विद्यापीठातील परीक्षा विभागाकडून त्याबाबतचे अधिकृत पत्र द्यावे. |

Scanned with OKEN Scanner

| गुणांची टक्केवारी | श्रेणी | | पदवी | पदव्युत्तर पदवी | पदवीनंतरची अतिरिक्त पदविका |
|---|---|---|---|---|---|
| 75 & वरील | विशेष प्राविण्य | O श्रेणी | ६ गुण | ६ गुण | ६ गुण |
| ६० ते ७४ | प्रथम श्रेणी | A आणि A+ | ५ गुण | ५ गुण | ५ गुण |
| ५० ते ५९ | द्वितीय श्रेणी | B आणि B+ | ४ गुण | ४ गुण | ४ गुण |
| ४० ते ४९ | तृतीय श्रेणी | C आणि | | ३ गुण | ३ गुण |

UGC ने १९९८ पूर्वी पंच बिंदूमापन श्रेणी होती, १९९८ ते २०१४ पर्यंत सप्तबिंदू मापन श्रेणी होती. २०१४ नंतर दशबिंदू मापन श्रेणी आहे, त्या श्रेणी आणि टक्केवारी मध्ये भिन्नता आहे. परंतु प्रवेशार्थ्यांना वरील शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर गुण देणे आवश्यक आहे, तरी मार्गदर्शनासाठी सादर.....

(सहपत्र ९)

**निर्णय:-**

१. बी.एड. शिक्षणक्रमास अतिरिक्त गुण देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आणि बी.एड. प्रवेशार्थीकडून बी.एड. प्रवेशार्थींनी पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदवी नंतरची अतिरिक्त पदविका यासाठी फक्त त्यांना मिळालेल्या टक्केवारीचा विचार करण्यात यावा व खालील कोष्टकानुसार त्यांना अतिरिक्त गुण देण्यात यावेत.

| गुणांची टक्केवारी | पदवी | पदव्युत्तर पदवी | पदवीनंतरची अतिरिक्त पदविका |
|---|---|---|---|
| 75 & वरील | ६ गुण | ६ गुण | ६ गुण |
| ६० ते ७४ | ५ गुण | ५ गुण | ५ गुण |
| ५० ते ५९ | ४ गुण | ४ गुण | ४ गुण |
| ४० ते ४९ | | ३ गुण | ३ गुण |

२. ज्या प्रवेशार्थींच्या गुण पत्रकावर फक्त CGPA ची नोंद केली असेल आणि टक्केवारी दिलेली नसेलतर गुणपत्रकाच्या मागील बाजूस दिलेल्या टक्केवारीच्या सूत्रनुसार टक्केवारी कडून ती नोंदवावी.

३. ज्या प्रवेशार्थींच्या गुण पत्रकावर फक्त CGPA ची नोंद केली असेल आणि टक्केवारी दिलेली



Scanned with OKEN Scanner

नसेलतर गुणपत्रकाच्या मागील बाजूस दिलेल्या टक्केवारीचे सूत्र दिलेले नसल्यास संबधित प्रवेशार्थीने त्या त्या विद्यापीठाच्या परीक्षा विभाग किंवा समकक्ष समितीकडून त्याचे रुपांतर करून घ्यावेत आणि तो संबंधित विद्यापीठातील सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित करून ती प्रत प्रवेशाच्या वेळी समितीला दाखवावी.

60.8 **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 8**

**विषय: शिक्षणशास्त्र विद्याशाखेंर्गत दिव्यांग अध्ययन केंद्र कार्यरत आहे, या केंद्रातर्फे RCI च्या मार्गदर्शनानुसार दिव्यांग संदर्भात विविध शिक्षणक्रम राबविले जातात. त्या संदर्भातील विविध विषय पुढे मान्यतेसाठी सादर केले आहेत.**

**60.8.1 उच्च सल्लगार समिती (Apex Advisory Committee) (AAC) तज्ज्ञांच्या मान्यतेबाबत...**

**टिप्पणी:** बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या भारतीय पुर्नवास परिषद (RCI) नवी दिल्ली यांचे नियमानुसार शिक्षणक्रमाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी Apex Advisory Committee (AAC) असणे आवश्यक आहे. ही तज्ज्ञ सल्लगार समितीचे स्वरूप सहपत्र १० मध्ये दिलेले आहे. त्यासाठी व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षाच्या वतीने दोन तज्ञ आणि भारतीय पुनर्वास परिषद (RCI) नवी दिल्ली यांचे दोन प्रतिनिधी असतात. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाने दोन तज्ज्ञ आणि RCI यांनी दोन तज्ज्ञ नवे विद्यापीठास कळविली आहेत. तज्ज्ञ सल्लागार समितीची नावे सहपत्र १० जोडलेले आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...

**(सहपत्र १०)**

**निर्णय:-** बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या Apex Advisory Committee (AAC) समिती सदस्यांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

**60.8.2 बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२७ पासून शिक्षणक्रम प्रवेश नियम**

**टिप्पणी:** विद्यापीठात बी.एड.विशेष शिक्षणक्रम सन २०१५ पासून कार्यान्वित केला जातो. ह्या शिक्षणक्रमाच्या नियमांमध्ये काही बदल करणे अपेक्षित होते. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर ...

**(सहपत्र ११)**

**निर्णय:-**

१. बी.एड.विशेष शिक्षणक्रमाच्या सन २०२४ या तुकडीसाठी प्रवेश नियम मान्य करण्यात आले.

२. ज्या प्रवेशार्थ्यांचे पाल्य दिव्यांग असतील त्यांना एक पाल्य किंवा दोन पाल्य दिव्यांग असल्यास वेगवेगळे गुण न देता ५ गुण देण्यात मान्यता देण्यात आली.

३. बी.एड. शिक्षणक्रमाप्रमाणे पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदवी नंतरची पदविका यासाठी जे



Scanned with OKEN Scanner

नियम मान्य करण्यात आले ते नियम बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाला लागू करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला.

**60.8.3 बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२७ पासून शिक्षणक्रम प्रवेश पूर्व परीक्षा घेण्याबाबत...**

**टिप्पणी:** विद्यापीठातील बी. एड. विशेष शिक्षणक्रमाच्या सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी भारतीय पुनर्वास परिषद (RCI) यांच्या कडून काही नियम व अटी बंधनकारक केल्यामुळे प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांची प्रवेश पूर्व परीक्षा/ मुलाखत घेणे बंधनकारक केले आहे. प्रवेश परीक्षेचे स्वरूप सहपत्र १२ जोडण्यात आलेले आहे. तरी ही परीक्षा विद्यापीठाने MKCL शी Learning management system साठी करण्यात आलेल्या करारमध्ये विद्यापीठाच्या इतर कार्यासाठीही सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे. त्या आधारे बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या प्रवेश पात्रता परीक्षा घेण्यासाठी software विकसित करण्यास सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**(सहपत्र १२)**

**निर्णय:-** Learning Management System साठी करण्यात आलेल्या करारानुसार त्या संबंधित संस्थेकडून विशेष बी.एड. साठी प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यासाठी software विकसित करण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.

**60.8.4 समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार समिती संरचने बाबत...**

**टिप्पणी:** नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) (मुद्दा.६.) नुसार दिव्यांगाना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठीचे विवेचन करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने अंगणवाडी शिक्षिका, विशेष शिक्षक आणि मुख्या प्रवाहातील शिक्षकांना समावेशित शिक्षणात कार्य करण्यासाठी विद्यापीठामार्फत संबंधित प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन करण्यास आणि संबंधित तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यांच्या नावांना मा.कुलगुरूंची मान्यता देण्यात आली आहे. सहपत्र १३ मध्ये विशेष शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांची नावे दिलेली आहेत. सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...

**(सहपत्र १३)**

**निर्णय:-**

१. समावेशित शिक्षणाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.
२. या शिक्षणक्रमासाठी विकसित करण्यात आलेले संरचना आणि अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आणि तज्ज्ञ सल्लागार समितीने त्यात बदल सुचविल्यास त्या बाबतचा अधिकार संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आला.



Scanned with OKEN Scanner

**60.8.5 मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार समिती संरचने बाबत...**

**टिप्पणी:** मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम या संदर्भात शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ५८ दि.०३.१०.२०२३ विषय क्र. ५८.११.०५ मान्यता देण्यात आली आहे शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीच्या वृत्तांताला दि.२९.११.२०२३ रोजी झालेल्या विद्वत परिषदेमध्ये मान्यता मिळालेली आहे संदर्भानुसार विद्यापीठात मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. सहपत्र १४ मध्ये विशेष शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांची नावे दिलेली आहेत. सदर शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...

**(सहपत्र १४)**

**निर्णय:-**

१. मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा शिक्षणाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

२. या शिक्षणक्रमासाठी विकसित करण्यात आलेले संरचना आणि अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आणि तज्ज्ञ सल्लागार समितीने त्यात बदल सुचविल्यास त्या बाबतचा अधिकार संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आला.

**60.8.6 अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार समिती बाबत...**

**टिपणी:** अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम या संदर्भात शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र.५८ दिनांक ०३.१०.२०२३ विषय क्र.५८.११.०५ मान्यता देण्यात आली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीच्या वृत्तांताला दि. २९.११.२०२३ रोजी झालेल्या विद्वत परिषदेमध्ये मान्यता मिळालेली आहे. संदर्भानुसार विद्यापीठात अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. सहपत्र १५ मध्ये विशेष शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांची नावे दिलेली आहेत. सदर शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...

**सहपत्र १५**

**निर्णय :-**

१. अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

२. या शिक्षणक्रमासाठी विकसित करण्यात आलेले संरचना आणि अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आणि तज्ज्ञ सल्लागार समितीने त्यात बदल सुचविल्यास त्या बाबतचा अधिकार संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आला.



Scanned with OKEN Scanner

**60.8.7 बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमातील इंग्रजीतील अभ्यासक्रमाच्या स्वयं अध्यापन साहित्याचे भावानुवाद तज्ज्ञ नावास मान्यतेबाबत...**

**टिप्पणी:** बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य ६ अभ्यासक्रमाचे एकूण ८ घटक हे इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहेत. तरी ह्या घटकाचे मराठी भाषेमध्ये अनुवाद करावयाचा आहे. भावानुवाद करण्यासाठी भावानुवादाच्या विशेष शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांची नावे दिलेली आहेत. सदर शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय मान्यतेसाठी सादर ...

| अनु.क्र. | अनुवादकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | ई मेल आयडी / मोबाईल नबंर |
|---|---|---|---|
| १. | प्रा. शशिकला गायकवाड | पी.एच.डी (शिक्षणशास्त्र ) बी.एड.,एम.एड. | gshashi1946@gmail.com |
| २. | डॉ.अनिल ढवळे | पी.एच.डी (शिक्षणशास्त्र ) बी.एड..(HI),एम.एड.(HI) | dse.amt@gmail.com |
| ३. | डॉ. माधव गोरे | पी.एच.डी (शिक्षणशास्त्र ) बी.एड. ,एम.एड.(HI) | goremadhav11@gmail.com |
| ४. | प्रा.शिवानंद कहाळेकर | बी.एड. ,एम.एड.(VI) | Kahalekar.shiva@gmail.com |
| ५. | डॉ.साधना तांदळे | पी.एच.डी (विशेष शिक्षण) बी.एड. ,एम.एड.(HI) | sadhana746@gmail.com |

**निर्णय:-** बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमातील इंग्रजीतील अभ्यासक्रमाच्या स्वयं अध्यापन साहित्याचे भावानुवाद तज्ज्ञ नावास मान्यता देण्यात आली आणि या व्यतिरिक्त अन्य तज्ज्ञांची गरज भासल्यास त्यांच्या निवडीचा अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आला.

60.9 **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 9**

**विषय: एकात्मिक बी.ए.बी.एड., बी.एससी.बी.एड. आणि बी.कॉम. बी.एड. शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रम मान्यतेबाबत...**

**टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेत इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाच्या धर्तीवर एकात्मिक बी.एड. (बी.ए.बी.एड., बी.एससी.बी.एड. आणि बी.कॉम. बी.एड.) अभ्यासक्रम सुरु करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाला ना हरकत प्रमाणपत्रासाठी पाठविण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाने त्यास मान्यता दिलेले आहे. Major (Education), Major (Discipline), Stages specific content-cum Pedagogy, Ability enhancement and value-added courses. Open elective, School experience, Community engagement and service त्याअनुषंगाने NCTE कडे ही सन २०२५-२०२६ या वर्षासाठी एकात्मिक बी.ए.बी.एड. बी.कॉम.बी.एड. आणि बी.एस्सी.बी.एड. दि. १७/०५/२०२४ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सदर एकात्मिक बी.एड. शिक्षणक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या संरचनेस ५९ वी –बी -1/एफ 178/2023/6 दि. 13.12.2023 शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेत मान्यता देण्यात आली होती.



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | दि. ५ मार्च २०२४ रोजी या शिक्षणक्रमासाठी घेण्यात आलेल्या तज्ज्ञ सल्लागार समितीने (PAC) तयार केलेला या शिक्षणक्रमातील सर्व अभ्यासक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखेपुढे चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>ते सहपत्र 2 मध्ये दिलेले आहे.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे एकात्मिक बी.ए.बी.एड. बी.कॉम.बी.एड.आणि बी.एस्सी.बी.एड. सन २०२५ सुरु करण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर....<br>**(सहपत्र १६)**<br>**निर्णय:-** एकात्मिक बी.ए.बी.एड., बी.एससी.बी.एड. आणि बी.कॉम. बी.एड. शिक्षणक्रमातील विविध संरचना आणि विविध अभ्यासक्रमातील आणि त्यातील घटक कार्यवाही आणि मूल्यमापन योजनेला तत्वत: मान्यता देण्यात आली आणि NCTE ने ITEP संदर्भातील निकषातील काही बदल झाल्यास ते बदल करण्याचा अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आला. |
| 60.10 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 10**<br>**विषय:** मार्गदर्शन व समुपदेशन (संमंत्रण) पदविका शिक्षणक्रमाच्या आशय संपादक तज्ज्ञांच्या यादीस कार्योत्तर मान्यतेबाबत....<br>**टिप्पणी:-** P110 मार्गदर्शन व समुपदेशन (संमंत्रण) पदविका शिक्षणक्रम विकसित करण्यात येत आहे. त्यातील आठ अभ्यासक्रमासाठी आशय संपादक तज्ज्ञांच्या यादीस मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. या शिक्षणक्रमाच्या आशय संपादक तज्ज्ञाच्या यादीस कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.....<br>**(सहपत्र १७)**<br>**निर्णय:-** मार्गदर्शन व समुपदेशन (संमंत्रण) पदविका शिक्षणक्रमाच्या आशय संपादक तज्ज्ञांच्या यादीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| 60.11 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 11**<br>**विषय: विद्याशाखेतील पदवी शिक्षणक्रमाच्या अध्ययनार्थीसाठी "संविधानिक लोकशाही मूल्यांचा परिचय" पूरक अध्ययन पुस्तिकेबाबत....**<br>**टिप्पणी:** विद्याशाखेतील पदवी शिक्षणक्रमाच्या अध्ययनार्थीसाठी **"संविधानिक लोकशाही मूल्यांचा परिचय"** पूरक अध्ययन पुस्तिका अभ्यासक्रमाचे विकसनासाठी विद्याशाखा परिषद ठराव क्र. ५८.१०, विषय. क्र. बी -१ / एफ- १७७ / २०२३ / १० या अन्वये पाठ्यक्रम विकसन समिती स्थापनकरण्याचा निर्णय झालेला आहे. तज्ज्ञ पाठ्यक्रम समिती स्थापन करण्यास आणि त्यांच्या मार्गदर्शनात **"संविधानिक लोकशाही मूल्यांचा परिचय"** पूरक अध्ययन पुस्तिका लेखन व संपादनास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. या शिक्षणक्रमाच्या अध्ययन पुस्तिका लेखन व संपादनास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर....<br>**(सहपत्र १८)**<br>**निर्णय:-** विद्याशाखेतील पदवी शिक्षणक्रमाच्या अध्ययनार्थीसाठी "संविधानिक लोकशाही मूल्यांचा परिचय" पूरक अध्ययन पुस्तिकास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 60.12 | विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 12<br>**विषय: शालेय व्यवहारांकरिता माहिती संप्रेषण C-35 (ICTSP) शिक्षणक्रम स्थगित करणे बाबत...**<br>**टिप्पणी :-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेत शालेय व्यवहारांकरिता माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (Information Communication Technology for School Practices – ICTSP) शिक्षणक्रम C-35 सुरु आहे. सदर शिक्षणक्रम प्रवेश अभ्यासकेंद्रांचा आढावा घेतला असता असे दिसून येते कि, मागील काही वर्षापासून या शिक्षणक्रमास प्रवेश नगण्य होत आहेत.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:** मा. कुलगुरू यांच्या सूचनेनुसार संचालकांशी चर्चा केल्यानुसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सदरचा शिक्षणक्रम ICTSP (C-35) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी प्रवेशप्रक्रियेतून स्थगित ठेवण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय:-** शालेय व्यवहारांकरिता माहिती संप्रेषण C-35 (ICTSP) शिक्षणक्रम सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी स्थगित ठेवण्यास मान्यता देण्यात आली. |
| 60.13 | विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 13<br>**विषय: नवीन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत...**<br>**टिप्पणी:-** सन २०१० च्या जनगणनेनुसार भारताच्या लोकसंख्येतील अंदाजे दिव्यांगाची लोकसंख्या २.२१% इतकी आहे.WHO अहवालानुसार नुसार १०० मुलांच्या मागे १ मूल Autism Spectrum Disorder (ASD) मूल आहे. RPWD अधिनियम २०१६ मध्ये दिव्यांगांच्या प्रकारामध्ये देखील वाढ केलेली आहे. संबधित दिव्यांगाच्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या पालकांना आणि समाजातील इतर stakeholder ला जनजागृतीची आवश्यकता आहे. तसेच त्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबर व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे. पालक, सामान्य शिक्षक, दिव्यांग मुलांचे भावंड हा लक्ष्य गट लक्षात ठेऊन खाली नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसित करण्यास इच्छुक आहोत.<br>**१) स्वमग्नता प्रमाणपत्र (Autism Spectrum Disorder)**<br>**२) व्यावसायिक शिक्षण प्रमाणपत्र (Vocational Education)**<br>**३) छाया शिक्षक प्रमाणपत्र (ShadowTeacher)**<br>**४) पालकत्व प्रमाणपत्र (Parenting)**<br>**५) गृह आधारित शिक्षण प्रमाणपत्र (Home based Education)**<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:-**<br>तरी सदर विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे चर्चेसाठी व मान्यतेसाठी सादर ...<br>**निर्णय:-** दिव्यांगण संदर्भात वरील प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसन करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 60.14 | विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 14<br>**विषय: अनुदेशन प्रणाली अभिकल्प अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रम विकसन समिती, लेखन संपादक समिती आणि घटक उपघटकांना कार्योत्तर मान्यता देणे बाबत....** |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | **टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे अनुदेशन प्रणाली अभिकल्प हा चार श्रेयांकाच कोर्स विकसित करण्यात येत आहे. त्याची पाठ्यक्रम विकसन समिती, लेखक संपादक समितीला मा. कुलगुरूंची मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानंतर पाठ्यक्रम विकसित करून घटक व उपघटक निश्चित करण्यात आले. त्यास मा. कुलगुरूंची मान्यता घेण्यात आलेली आहे. मा. कुलगुरूंनी डॉ. ललिता वर्तक यांचे नाव आशय संपादनासाठी दिलेले आहे.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:** अनुदेशन प्रणाली अभिकल्प पाठ्यक्रम विकसन समिती लेखक संपादक समिती आणि पाठ्याक्रमास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर....<br>**(सहपत्र १९)**<br>**निर्णय:-** अनुदेशन प्रणाली अभिकल्प अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रम विकसन समिती, लेखक, संपादक समिती आणि घटक उपघटकांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| 60.15 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 15**<br>**विषय :** बी.एड.(ODL) शिक्षणक्रमाच्या स्वयं अध्ययन साहित्य संरचना, स्वयं अध्ययन साहित्यास मान्यता मिळणेबाबत<br>**टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत बी.एड. (ODL) शिक्षणक्रम कार्यान्वित केला जातो. NCFTE 2009 आणि NCTE 2014 च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार बी.एड. (ODL) शिक्षणक्रमाचे स्वयं अध्ययन साहित्य विकसित करण्यात आलेले आहे. सदरील स्वयं अध्ययन साहित्य संरचना व स्वयं अध्ययन साहित्य शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेत चर्चा मान्यतेसाठी सादर.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:** बी.एड.(ODL) शिक्षणक्रमाच्या स्वयं अध्ययन साहित्य संरचना, स्वयं अध्ययन साहित्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर.....<br>**(सहपत्र २०)**<br>**निर्णय:-** बी.एड.(ODL) शिक्षणक्रमाच्या स्वयं अध्ययन साहित्य संरचना, स्वयं अध्ययन साहित्यास मान्यता देण्यात आली. |
| 60.16 | **विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 16**<br>**विषय :** बी.एड.(ODL) शिक्षणक्रमाच्या PPR (Programme Project Report) ला मान्यता मिळणेबाबत<br>**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत बी.एड. (ODL) शिक्षणक्रम कार्यान्वित केला जातो. बी.एड. (ODL) शिक्षणक्रमास UGC-DEB ची मान्यता आवश्यक आहे. सदरील मान्यता मिळण्यासाठी UGC च्या ०६ मे २०२४ पत्रानुसार बी.एड. (ODL) PPR तयार करण्यात आलेला आहे. सदरील विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:** बी.एड.(ODL) शिक्षणक्रमाच्या PPR (Programme Project Report) सदरील विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर....<br>**(सहपत्र २१)** |

Scanned with OKEN Scanner

**निर्णय:-** बी.एड.(ODL) शिक्षणक्रमाच्या PPR (Programme Project Report) सदर विषयास मान्यता देण्यात आली.

60.17 **ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. बी.-1 / एफ-179 / 2024/ 17**

**60.17.1 विषय: शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानवविद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसित करणेबाबत....**

**टिप्पणी:** NCTE च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेत मानसशास्त्रीय प्रयोगशाळेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, याच विद्याशाखेत दिव्यांग अध्ययन केंद्रे राबवितात येते. विशेष बी.एड. शिक्षणक्रमातही दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार चाचण्या कराव्या लागतात. शिक्षणशास्त्र विद्याशाखा, विशेष बी.एड. अभ्यासकेंद्र, एम.ए. शिक्षणशास्त्राचे अभ्यासकेंद्र राबविण्यात येते. विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय चाचण्यांबाबत प्रात्यक्षिक अनुभव करण्यासाठी मानसशास्त्रीय प्रयोगशाळेची गरज आहे.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानव्यविद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसन मान्यता चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानवविद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसित करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.

**60.17.2 विषय: सिलेज विकसन प्रकल्प राबविणेबाबत.**

**टिप्पणी:** पद्मभूषण अनिल काकोडकर ह्यांनी सिलेज ही संकल्पना विकसित केलेली आहे. भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरमध्ये विविध झालेले तंत्रज्ञान ग्रामीण भागात विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. अशा तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशिक्षण स्थळ विकसित केले जाते. मुक्त विद्यापिठामार्फत प्रथम नाशिक जवळील सिन्नर येथे हा सिलेज प्रकल्प विकसित करण्याचा मानस आहे. त्याची यशस्वीता लक्षात आल्यानंतर इतर विभागीय केंद्रात सर स्थानिक गरजेनुसार विकसित करण्यात येईल.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर:**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने सिलेज विकसन प्रकल्प राबविण्यास मान्यता द्यावी.

**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे सिलेज विकसन प्रकल्प घेण्यास मान्यता देण्यात आली.

**60.17.3 विषय : सहकार्यात्मक आणि सहयोगात्मक अध्ययन प्रमाणपत्र सुरु करणेबाबत**

**टिप्पणी :** विद्यापीठाचा बहाई अकादमी पांचगणी ह्यांच्याशी औपचारिक करारनामा झालेला आहे.



Scanned with OKEN Scanner

त्यात सहकार्यात्मक अध्ययन आणि सहकार्यात्मक खेळ या शिक्षणक्रमाच्या नावास मान्यता दिलेली आहे परंतु त्याची व्याप्ती कमी असल्यामुळे सदर शिक्षणक्रमाच्या नावास बदल करून तो सहकार्यात्मक आणि सहयोगात्मक अध्ययन या शीर्षकाने सुरु करावा असे वाटते.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

सहकार्यात्मक आणि सहयोगात्मक अध्ययन प्रमाणपत्र शिक्षणक्रम असा नावात बदल करून सदर शिक्षणक्रम विकसनासाठी चर्चा व मान्यतेसाठी सादर.....

**निर्णय:** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि बहाई अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार्यात्मक आणि सहयोगात्मक अध्ययन या नावाने प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.

**60.17.4 विषय: शालेय व्यवस्थापन पदविका DSM (P10) विशेष तुकडी राबविणेबाबत.**

**टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक पदावर कार्य करणाऱ्या शिक्षकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका (Diploma in School Management) (DSM) हा शिक्षणक्रम कार्यान्वित आहे. सदरील शिक्षणक्रम हा महाराष्ट्र शासनाने मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक पदावर कार्य करणा-या व्यक्तीसाठी अनिवार्य केलेला आहे. मात्र शैक्षणिक वर्षे २०२३-२४ मध्ये मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक पदावर कार्य करून निवृत झालेल्या व निवृत होत असलेल्या काही मुख्याध्यापक / उपमुख्यापकांनी शालेय व्यवस्थापन पदविका (DSM) शिक्षणक्रम अद्यापही पूर्ण केलेला नाही. त्यामुळे मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक पदाच्या वेतन निश्चिती व निवृत्ती वेतन निश्चिती होत नसल्याने 'पेन्शनला डी.एस.एम.चा अडथळा' अशा प्रकारचे पुणे दैनिक पूढारी वृतपत्रात दि. २८/०३/२०२४ वृत्त आले. त्या मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकांचे नुकसान होउ नये म्हणून सदर बातमीची विद्यापीठाचे मा. कुलगुरू यांनी गांभीर्याने दखल घेतली व शिक्षणशास्त्र विद्याशाखेने या मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक पदावरून निवृत्त झालेल्या व्यक्तींसाठी विद्याशाखेंतर्गत चालू असलेल्या अभ्यासकेंद्रावर एक विशेष तुकडी कार्यान्वित करण्यास सांगितले. त्याचे प्रवेश एप्रिल २०२४ मध्ये करण्यात यावे व परीक्षा डिसेंबर २०२४ / जानेवारी २०२५ मध्ये घेण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिली होती. याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. मात्र शासनाकडून किंवा संबंधित प्रवेशार्थीकडूनही या बाबत कोणताही पत्रव्यवहार / विचारणा करण्यात आलेली नाही.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

शालेय व्यवस्थापन पदविकेचे प्रवेश १ जून २०२४ पासून सुरु होत आहेत. २०२४ च्या विशेष तुकडीसाठी शासनाकडून किंवा संबंधित प्रवेशार्थीकडूनही या बाबत कोणताही पत्रव्यवहार / विचारणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रस्ताव मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक / पर्यवेक्षक निवृत्त होत असलेल्या प्रवेशार्थींनी मागणी केल्यास त्यांना नियमित तुकडी बरोबर महाराष्ट्रातील शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासकेंद्रावर प्रवेश घेण्याबाबत चर्चा व मान्यतेसाठी सादर....

(सहपत्र २२)

**निर्णय** :- शिक्षणशास्त्र विद्याशाखेत विशेष तुकडी न राबवता प्रवेशार्थी महाराष्ट्रातील विद्यापीठाने



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | निर्धारित केलेल्या शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासकेंद्रवर प्रवेश घेऊन त्यांची अंतिम परीक्षा या शिक्षणक्रमाच्या नियमित विद्यार्थ्यांन बरोबर मे २०२५ मध्ये घेण्यास मान्यता देण्यात आली. |
| | **60.17.5 विषय : Post Graduate Diploma in Higher Education (PGDHE) हा नवीन शिक्षणक्रम सुरु करण्याबाबत**<br>**टिप्पणी:** Post Graduate Diploma in Higher Education (PGDHE) हा विविध विद्यापीठामध्ये जास्त मागणी असलेला एक लोकप्रिय शैक्षणिक अभ्यासक्रम असून, राष्ट्रीय शिक्षण धोरण (1986) आणि NEP 2020 च्या शिफारशींच्या अनुषंगाने हा कार्यक्रम आपल्या विद्यापीठात शिक्षणशास्त्र विद्याशाखेमध्ये द्विभाषिक (मराठी / इंग्रजी) पद्धतीने, एक वर्ष कालावधीचा, २४ श्रेयांक असलेला ODL अभ्यासक्रम विकसित करण्याचे नियोजन आहे. उच्च शिक्षणामध्ये अध्यापनाशी संबंधित तसेच प्रशासकीय कामामध्ये आवश्यक ज्ञान, समज आणि कौशल्ये प्रदान करणे हा मुख्य हेतू आहे. विविध विद्यापीठ स्तरावर सुरु असलेल्या या अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास करून, अभ्यासक्रम निश्चिती, स्वयं अध्ययन साहित्य संरचना, लेखक संपादन आणि साहित्य निर्मिती इत्यादी बाबी निश्चित करण्यास तत्वत: मान्यता मिळावी.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे Post Graduate Diploma in Higher Education (PGDHE) सुरु करण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर...<br><br>**निर्णय :-**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे Post Graduate Diploma in Higher Education (PGDHE) सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. |
| | **60.17.6 विषय:** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद पुणे (SCERT) यांच्या संयुक्त विद्यमाने इंग्लिश स्पिकिंग कोर्स शाळांमध्ये राबविण्यासाठी अपेक्षित आर्थिक खर्चाचे विवरण सादर करणेबाबत.<br>**टिप्पणी:**<br>उपरोक्त विषय संदर्भात आपल्या विद्यापीठाच्या माध्यमातून सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद, पुणे (SCERT) यांना प्रस्ताव देण्यात आला होता. सदरहू प्रस्तावानुसार इंग्लिश स्पिकिंग शाळांमध्ये राबविण्यास राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद पुणे यांची अंशत: मान्यता मिळालेली असून, प्रस्तावित प्रकल्प राबविण्यासाठी विविध शुल्क आकारण्याबाबत शासन स्तरावरून उचित निर्णय होणे आवश्यक आहे असे गाभा समितीच्या इतिवृत्तात नमूद आहे. यासंदर्भात शुल्क आकारण्यासाठी अपेक्षित आर्थिक खर्चाचे विवरण सादर करणेबाबत विचारणा केलेली आहे.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखे तर्फे इंग्लिश स्पिकिंग कोर्स राबवण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास चर्चा व |



Scanned with OKEN Scanner

मान्यतेसाठी सादर....

(सहपत्र २३)

**निर्णय** :- शिक्षणशास्त्र विद्याशाखे तर्फे English speaking कोर्स सुरु करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आणि विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार आर्थिक खर्चाबाबत विद्यापीठ पातळीवर निर्णय घेण्यास मान्यता देण्यात आली.

60.17.6 **विषय : प्रगत अध्यापन शास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत**

**टिप्पणी**: NEP 2020 नुसार अध्यापन पद्धतीमध्ये अनेक नवनवीन अध्यापन पद्धतीचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पुरा IKS प्राचीन कालीन अध्यापन पद्धतींचा अभ्यास करावा लागणार आहे. तंत्रज्ञानामुळे अनेक वेगळ्या अध्यापन पद्धती विकसित होत आहेत या सर्वांचा विचार या अभ्यासक्रमात केला जाणार आहे.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेत प्रगत अध्यापन शास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता द्यावी.

**निर्णय:-**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेत प्रगत अध्यापन शास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली.

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यता आले.

प्रा.विजयकुमार पाईकराव,
**सचिव,शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषद**

प्रा.संजीवनी महाले,
**अध्यक्ष,शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषद**

**मान्य/ अमान्य**

**मा.कुलगुरू ह्यांचे मान्यतेसाठी सविनय सादर............**

Scanned with OKEN Scanner